व्हीएसआय/कृषि/ज्ञानयाग–ज्ञानलक्ष्मी/ /२०११–१२ ऑक्टोबर १३, २०११

प्रति,
मा.कार्यकारी संचालक

**विषय : 'ऊस शेती ज्ञानयाग' व 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' कार्यक्रमाबाबत...**

महोदय,

राज्यात साखर उद्योग आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी ऊसाची उत्पादकता आणि साखरेचा उतारा वाढविणे आवश्यक आहे. उपलब्ध तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास ऊसाची उत्पादकता आणि साखर उतारा यामध्ये भरीव वाढ करणे सहज शक्य आहे हे राज्यातील अनेक प्रगतशील शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे. या सुधारित तंत्रज्ञानाचा वापर जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी करावा या उद्देशाने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट तर्फे प्रत्येक वर्षी ऊस उत्पादक पुरूष शेतकऱ्यांसाठी 'ऊस शेती ज्ञानयाग' आणि ऊस उत्पादक महिला शेतकऱ्यांसाठी 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. या वर्षीच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | कार्यक्रमाचे नाव | कालावधी | दिनांक | प्रशिक्षणार्थी प्रवेश मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १. | **ऊस शेती ज्ञानलक्ष्मी**<br>महाराष्ट्रातील सर्व साखर कारखाने व इतर राज्यातील सदस्य कारखाने यांच्या महिला शेतकऱ्यांसाठी | पाच दिवस | १३ ते १७ नोव्हेंबर २०११ | २०० |
| २. | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सदस्य कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | २२ ते २६ नोव्हेंबर २०११ | २२५ |
| ३. | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>पुणे, सोलापूर, अहमदनगर, नाशिक जिल्ह्यातील सदस्य कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | २९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर २०११ | २२५ |
| ४. | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>मराठवाडा, विदर्भ व खानदेश आणि इतर राज्यातील सदस्य कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | ६ ते १० डिसेंबर २०११ | २०० |

'ऊस शेती ज्ञानयाग' या कार्यक्रमाचे हे तेविसावे वर्ष असून 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' या कार्यक्रमाचे हे सातवे वर्ष आहे. वरील कार्यक्रमात आत्तापर्यंत जवळजवळ ११५०० शेतकरी प्रशिक्षित झालेले आहेत. सदर कार्यक्रमात ऊस शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान या विषयावर प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन केले जाते. प्रशिक्षण घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे, तसेच प्रशिक्षित शेतकऱ्यांनी ऊस शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊसाचे दरमहा दरएकरी उत्पन्न वाढविलेले आहे. प्रशिक्षणार्थींची राहाण्याची व जेवणाची सोय संस्थेच्या वसतीगृहात केली जाते, तसेच प्रशिक्षण साहित्य म्हणून त्यांना बॅग, पुस्तिका, पेन व पॅड देखील पुरविले जाते. समारोप प्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्रक आणि सामुदायिक फोटोची प्रत दिली जाते.

तरी कृपया आपण आपल्या साखर कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस उत्पादक पुरूष व महिला शेतकऱ्यांना वरील कालावधीत प्रशिक्षणासाठी पाठवून प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. प्रशिक्षणार्थींनी कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी मांजरी येथील वसतीगृहामध्ये मुक्कामास यावे. प्रशिक्षणासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थीस रू.१२५०/- याप्रमाणे फी आकारण्यात येईल. यात महिला प्रशिक्षणार्थींच्या सोबत येणाऱ्या अन्य व्यक्तींचा समावेश नसून त्यांचे बरोबर अन्य व्यक्ती आल्यास त्यांना प्रतिदिन रू.१४५/- प्रमाणे वेगळा आकार द्यावा लागेल. तसेच प्रशिक्षणार्थींच्या बरोबर येणाऱ्या वाहनचालकांनाही प्रति दिन रू.१४५/- प्रमाणे वेगळा आकार द्यावा लागेल.प्रशिक्षणार्थींच्या नावाची यादी व त्याचे एकूण शुल्क वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, पुणे यांचे नावे डिमांड ड्राफ्ट द्वारे ३१ ऑक्टोबर २०११ च्या आत पाठवून द्यावे, ही विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित,

**(शिवाजीराव देशमुख)**